सकाळ

# रवळनाथ फायनान्सतर्फे 'संवेदना'ला मदत

**सांगली, ता. १६ :** श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने येथील संवेदना शुश्रुषा केंद्राला संस्थेतर्फे २५ हजारांची मदत दिली. संस्थेच्या दहाव्या सांगली शाखेचा प्रारंभ माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्याहस्ते शनिवारी (ता. २४) होणार आहे. दरम्यान, श्री. मुळे यांच्या संकल्पनेतून 'चांगुलपणाची चळवळ'अंतर्गत आज संवेदना केंद्राला मदत देण्यात आली.

रवळनाथ संस्थेने समाजोपयोगी उपक्रमांबरोबरच पूरग्रस्त, अपघातग्रस्त, जळितग्रस्तांसह गरजू विद्यार्थी, रुग्णांना वेळोवेळी आर्थिक मदत करीत कृतिशील बांधिलकी जोपासली आहे. रौप्यमहोत्सव साजरा करत असलेल्या संस्थेने आपद्ग्रस्तांच्या मदतीसह विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रमांसाठी आजअखेर तब्बल ५० लाखांची मदत केली आहे.



**सांगली : डॉ. दिलीप शिंदे व डॉ. नीलम शिंदे यांच्याकडे मदतीचा धनादेश सुपुर्द करताना एम. एल. चौगुले. शेजारी प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हनकर यांच्यासह उपस्थित संचालक व सदस्य.**

डॉ. मुळे हे 'रवळनाथ'चे ब्रँड ॲम्बेसीडर आहेत. 'रवळनाथ'चे संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले, सांगली शाखेचे चेअरमन प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर यांनी संवेदना केंद्राला भेट देऊन ही मदत सुपूर्द केली. संस्थापक-अध्यक्ष डॉ. दिलीप शिंदे, सदस्य डॉ. नीलम शिंदे यांनी या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शाखेच्या उद्घाटनासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, 'नॅक'चे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील, सेवानिवृत्त प्रादेशिक परिवहन अधिकारी बाबासाहेब आजरी, सेवानिवृत्त पोलिस अधिकारी सुहास नाडगौडा यांची उपस्थिती आहे.

उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, मीना रिंगणे, श्रीमती उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव, शाखा सल्लागार प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, प्रा. संजय ठिगळे, इंजि. रमेश चराटे, सतीश हेरवाडे, प्रा. प्रभा पाटील, प्रा. डॉ. मेघा महावीर आलासे, प्रा. माणिक घुमाई, शाखाधिकारी श्रेयस गावडे, बोर्ड सेक्रेटरी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.